# प्रभु तरुण

| वर्ष ५५ | अंक ०७ | मुंबई | १६ मार्च, २०२२ | पाने ६ | किंमत रु. १ |
| --- | --- | --- | --- | --- | --- |

( *स्थापना :* तारीख २५ ऑगस्ट १९२३ )

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*संपादकीय*

## अल्‌विदा...

—सुहासिनी कीर्तिकर

'लता' हे शब्द उलट करून लिहिले तर शब्द तयार होतो - 'ताल'. हा ताल आपल्याला ओतप्रोत, मनभरून ज्यांनी दिला त्या लताबाईंचे गेल्या महिन्यात आपल्यातून निघून जाणे झाले. स्वर्गीय आवाज असलेल्या दैवी लताबाई दैववशात् स्वर्गीय झाल्या. जगभरचा त्यांच्या आवाजाने भरलेला रसिक श्रोता मुग्धपणे हे अटळ आक्रीत सहन करीत राहिला. 'जन्ममृत्यूची अनित्य रहाटी' हे जन्मजाताचे अटळ भागधेय असते. ते कोणाला टळणार? दीनानाथ मंगेशकरांचा मृत्यू टळला का?... नाहीच. पितृछत्र अचानक हरवलेल्या मंगेशकर कुटुंबाला कालवशात् पोरकेपण सहन करीत 'जगण्याचा यज्ञ' चालू ठेवावाच लागला. खडतर परिस्थिती, कटू घटना, जीवनाला संपृक्त करणारे अनुभव या कुटुंबाने घेतले अन्... अन्... स्वत:ला सिद्ध केले. गानसिद्धीचा प्रत्यय देतघेत प्रसिद्ध झाले. त्यातली लता थोरली! 'शारदा' नावाच्या चित्रपटासाठी आवाज देण्याचा प्रसंग आला तर तिचा आवाज 'पतला' ठरवला गेला. तसं तर आपल्या भरदार, घुमारेदार आवाज आणि स्वच्छ उच्चारणामुळे सर्वांच्या मनात असलेल्या अमिताभ बच्चननाही आकाशवाणीने आवाजासाठी नाकरले होतेच ना? पण 'हिम्मते मर्दा तो मदद खुदा!' हे खरेच. लतादीदीने रियाज, प्रयत्न कायम ठेवला आणि नंतर तिचा आवाज विश्व व्यापून उरला. आज त्या नसल्या तरी 'आवाजही पहेचान' असलेल्या त्यांचे स्वर आपल्याला लपेटून, वेढून दिव्यानंद देतच रहाणार आहेत. गंमत पहा; एवढी युगकर्ती बाई - पण त्यांना आपण 'अहोजाहो' म्हणताना परकेपणा दाटून येतो. अगदी सहजपणे आपण 'लता काय गाते!' किंवा 'तिने काय आवाज दिलाय!' असे एकेरीतच सलगीने बोलतो. ते काय; आदर नाही म्हणून? की आपण त्यांच्या बरोबरीचे म्हणून? छे! छे!! 'पांडुरंगा', 'विठ्ठला' अशी हाक मारताना आपल्या मनात 'अहो, पांडुरंगा' येत नाही ना? 'अरे रामा, अरे कृष्णा' मध्ये 'अरेतुरे'च असते ना? आईला कुणी 'अहोजाहो' करते का? त्याच भावनेने आपण अगदी अंतराच्या तळातून (आदरानेच) लतादीदींना 'लता' म्हणतो, आशा भोसलेंना 'आशा काय गाते!!' म्हणतो. यामागे परस्परनात्यांची जिव्हाळ्यांची नाळ जोडली गेलीय.

आज 'लता' काळाच्या पडद्याआड गेल्यावर माझ्या आठवणींच्या पडद्यावर काही माझ्यासाठी ठेवा असणाऱ्या वा मला भाग्यक्षण देणाऱ्या क्षणांची पुन्हा उजळणी झाली. तशा त्या अत्यंत साध्या, क्षुद्र आठवणी! अशावेळी 'पु.लं.'नी बैठकीत सांगितलेला किस्सा आठवून गेला. तो असा - एक रंगभूमीवर धडपडणारा (बऱ्याच वेळा पडणारा!!) नट सांगत होता की, 'अरे, मी माहित्येय् का; त्या (प्रसिद्ध) नाटकात भूमिका केली आहे.' ऐकणाऱ्याने ते नाटक पाहिले होते. त्याला या बापड्याला पाहिलेले कुठे आठवेचना. त्याने मग विचारले, ''बदली भूमिका केलीत का?'' तर याने सांगितले की ''छे, छे, बदली नाही. अहो, त्या एका प्रसंगात नाही का; दाराशी पोस्टमन येतो आणि बेल वाजवून म्हणतो, ''पोस्टमऽऽन.' तो पोस्टमन मी होतो.'' माझ्या लताशी असलेल्या आठवणी या त्या पोस्टमनची भूमिका करणाऱ्या नटासारख्या. पण त्याला जसा ती भूमिका करताना आत्मगौरव वाटला तसा मलाही वाटतोय् आज या आठवणींची उजळणी करताना. 'छोटीसी दुनियाकी छोटीसी बात' है यह.

लता मंगेशकर आणि सगळेच मंगेशकर कुटुंब आमच्या वैद्यसरांच्या (शंकर वैद्य यांच्या) जवळीकीतले. त्यांची 'शतकांच्या यज्ञातूनी उठली एक केशरी ज्वाला' ही कविता हृदयनाथांनी संगीत देऊन लताच्या आवाजात अमर केली. आम्ही वैद्यसरांचे विद्यार्थी असतानाचा हा काळ! ही कविता मंगेशकरांच्या घरी रात्री दोन-अडीच वाजता कशी लिहिली; त्यातले 'केशरी' विशेषण लिहायला/सुचायला कसे दोन तास गेले; हे त्यांनी वर्गात आम्हाला सांगितले. आमच्या मनात खरोखरच 'अरुणोदय' झाला! मनात येत राहिले की 'अरे, गायिका, संगीतकार यांच्या संगतीत एक कविता अशी जन्माला येते!' 'जन्मवेणा' केशरी होतात!! त्याच काळात त्या सलगीमुळे वैद्यसरांनी लता आणि हृदयनाथ मंगेशकरांची दूरदर्शनवर छान मुलाखत घेतली. आठवतेय ते असे की त्या मुलाखतीत वैद्यसरांनी 'सागरा प्राण तळमळला' हे गीत कोरसमध्ये नेल्याची खंत व्यक्त केली होती. कारण ती सावरकरांची 'अक्रुर' वृत्तातील कविता होती. एकट्याने म्हणायची. सागराशी संवाद साधणारी. पण हृदयनाथ म्हणाले की, 'तो सागर आहे. म्हणून लटासदृश मी सागरा, सागराऽऽ साऽऽगरा' अशी चाल बांधली. पण नंतर मनाशी घोळवताना आजही मी ही कविता म्हणूनच म्हणते... असो. तर हे वैद्यसर लताच्या वाढदिवशी तिला शुभेच्छा द्यायला 'प्रभुकुंज'वर जायचे. हा भाग्ययोग सर्वांना नाही लाभायचा. भेटीची वेळ दिलेली असायची. वैद्यसर माझे शिक्षण पूर्ण झाल्यावरही 'आदर्श शिक्षक' म्हणून माझ्या सतत जवळचे होते. एकदा मी त्यांना म्हणाले की, 'सर, मला एकदा लतादीदींना जवळून नमस्कार करायचा आहे.' ते त्यांनी लक्षात ठेवले अन् एक दिवस ते लतादीदींशी बोलून वाढदिवशी मला त्यांच्यासोबत घेऊन गेले. अट एकच; 'बोलायचे नाही' ठीकच होते की. मला खऱ्या अर्थाने त्यांचे 'दर्शन'च तर घ्यायचे होते. मग तो क्षण आला भाग्याचा. सरांचे बोट धरून मी प्रभुकुंजमधील स्वरप्रभुला जवळून पाहिले; दर्शन घेतले. साक्षात् सरस्वतीचे दर्शन. गुरूंच्यासोबत. माझ्या आयुष्यातील तो चिरंजीव क्षण होता.

दुसरी दर्शनभेटही अशीच अकस्मात्. शंकर वैद्यांप्रमाणेच शांताबाई शेळकेही मंगेशकर कुटुंबीयांच्याच जणू घरातील. त्यांना माझे फार अप्रूप होते. कुठेही भेटल्या तरी उभे राहून आस्थेने गप्पा मारणार. आपणहून ओळख दाखवणार. त्यांच्या अनेक कविता वा गाणी मंगेशकरांनी सूर, संगीत देऊन अमर केलेली. चालीवर शब्द तात्काळ देण्याचे त्यांचे कसब वाखाणण्याजोगेच. लोकगीतांचा खजिनाच होता त्यांच्याजवळ. शब्दाचे भान होते. एकदा काय झाले की शांताबाई मंगेशकरांकडे होत्या. एरवी त्यांचा मुक्कामही असायचा तेथे. लताबाईंशी अखंड गप्पा चालायच्या. पण त्या दिवशी शांताबाईंबरोबर (त्यांचे सहचर) प्रभुणे नव्हते. त्यांना ताप होता आणि म्हणून 'साहित्य सहवासा'तच ते थांबले होते. गप्पांमध्ये वेळ गेला, रात्र झाली फार. अचानक शांताबाईंचा रात्री पावणेबारा वाजता फोन आला मला. म्हणाल्या, 'तू गिरगावात रहातेस. माझ्यासोबत येऊन वांद्र्याला मला सोडशील का?' 'नाही' म्हणताच आले नाही. मी आणि माझे यजमान टॅक्सी करून 'प्रभुकुंज'वर गेलो, शांताबाईंना घेतले आणि वांद्र्याला त्यांना सोडले. त्यावेळी मी लताबाईंना वाकून नमस्कार केला. 'तेथे कर माझे जुळती'!

शांताबाईंचे हे जन्मशताब्दी वर्ष आहे. लताच्या आठवणी शांताबाईंच्या आठवणीत गुंफून याव्यात; हा किती छान योगायोग! पुढे १९९६ की ९७ साली शांताबाई अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष झाल्या. पंढरपूरात होते संमेलन. शांताबाईंमुळे उद्घाटक लाभल्या होत्या लताबाई! (मनाला घर पाडणारी-) गंमत अशी की शांताबाईंकडे लोकगीतांचा प्रचंड खजिना होता. व्यवसाय

(पान २ कॉलम १ वर)

संपादकीय
(पान १ कॉलम ४ वरून)

प्राध्यापकाचा. सिद्धहस्त कवयित्री. साधेपणाने समोरच्याला जिंकणाऱ्या. प्रतिशारदाच त्या; पण त्या संमेलनात उद्‌घाटक म्हणून लताबाईंनी जे भाषण केले ते शांताबाईंच्या भाषणाला निष्प्रभ करून गेले. आजही लताचे ते भाषण माझ्या आठवणीत अगदी ताजे आहे.

लताबाईंची माझी ओळख, एक आठवण आहे ती मुंबई मराठी साहित्य संघातली. दाजी भाटवडेकर तेव्हा संघाध्यक्ष होते. त्यांच्या ओळखीने हृदयनाथ आणि लता प्रमुख पाहुणे म्हणून आली होती. त्या बोलल्या नाहीत; फक्त हृदयनाथ बोलले. पण कार्यक्रमाआधी चहापानाच्या स्थळी आम्ही एकत्र होतो. माझ्याबरोबर वसुंधरा पेंडसे होत्या. (आमची घट्ट मैत्रीच होती) वसुंधराला पाहिल्यावर लताताई उठल्या; जवळ घेऊन त्यांच्या आईंची (नंदिनी पेंडसेंची) चौकशी केली. नंतर कळले की सुरुवातीच्या खडतर काळात लता आणि त्यांचे कुटुंब काही काळ मास्टर विनायकांकडे होते. आप्पा पेंडसेंच्या घरासमोरच विनायकांचे (बेबी नंदाचे वडील) घर होते. तेव्हा लहानग्या लताला (कदाचित चौदा वय असावे.) विषमज्वर (टायफॉईड) झाला होता. त्या आजारपणात नंदिनी पेंडसेंनी लताची घरच्या माणसासारखी सेवा केली होती. आश्चर्य आणि कौतुक असे की 'सुरांची सम्राज्ञी' असलेल्या या 'भारतरत्ना'ने इतक्या काळानंतरही त्याची कृतज्ञ जाणीव ठेवली. मोठी माणसं अशीच असतात. कदाचित् म्हणूनच ती आणखी आणखी मोठ्ठी होतात. तो मोठेपणा मला अगदी दुरून का होईना; अनुभवता आला. (माझ्या आठवणीप्रमाणे लताबाईंनी संस्कृत श्लोकांची सुमिरन नावाची कॅसेट काढली. शेजारी इंग्रजी भाषांतरही असावे असे त्यांना वाटले. ते काम मृदुला जोशी यांनी केले. त्या कॅसेटच्या प्रकाशनात मृदुलाचा लताबाईंनी सन्मान केला. ही आठवण प्रभुप्रभात दिवाळी अंकात आणि मैत्री अनुदिनीमध्ये प्रसिद्ध झालीय. मृदुलाचा लताबाईंबरोबर फोटोही आहे.)

लता गेल्यावर त्यांच्या संपर्कातील आठवणी सांगताना त्यांच्या विशेषांबद्दल बोलताना, माहिती देताना 'वॉटस्‌अप'वर तर अनेकांनी भरभरून लिहिले. बडे गुलाम अली खाँनी 'एक भी सूर गलत नहीं होता। जराभी बेसुरी नही होती।' म्हटलेले अनेकांनी सांगितले. पुणे आकाशवाणीने त्यांच्या शास्त्रीय गाण्यावर आधारित सिनेसंगीताचा दोन भागात सादर केलेला कार्यक्रम परत प्रसारित केला. शिरीष कणेकरांनी लिहिले... लता अशी आख्यायिका होऊन राहिली. कै. भाऊ मराठेंनी निवेदनात सांगितलेली आठवण आली. 'या जगात कृष्ण विसरून गेलेली बासरी म्हणजे लता' हे अमरविधान झाले कारण लताचा स्वर अमर आहे. त्या स्वरावर, उच्चारावर तिने घेतलेली मेहनत आदर्श आहे. वीणा देवकडून सांगितलेली आठवण आहे माझी. 'पसायदान' गायचे तर तिचे वडील गो. नि. दांडेकर एक महिना लताकडे राहिले होते. उच्चार सुधारण्यासाठी. यश मिळाल्यानंतर असे कोण करते? उर्दू उच्चारांसाठी तिने शिकवणी लावली; पण 'पसायदाना'साठीही? म्हणून दंडवत घालावासा वाटतो त्यांना. विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष मनोहर म्हैसाळकर मंगेशकरांच्या गोतावळ्यातले. मुंबईला आले की मनोहर लताबाईंच्या घरीच उतरणार. तर हे वर्ष विदर्भ साहित्य संघाच्या शताब्दीचे आहे. चौदा जानेवारीला तेथे एक कार्यक्रम झाला (माझ्या ऑनलाईन उपस्थितीत) त्यावेळी लताबाईंनी म्हैसाळकरांना सांगितले, 'या वर्षी कधीही बोलवा. मी येईन.' वयाच्या ९३ व्या वर्षीही हे भान, ही जाणीव लताबाईंनी ठेवावी! हे माणूसपण. ही प्रगल्भता. ही साधी विचारसरणी. हे साहित्यप्रेम. हे स्वरांचे पूर्णत्व. 'पूर्णस्य पूर्णम् इदम्' अशा लताला 'अलविदा।' त्यांचेच 'अल् विदा, अल् विदा' हे स्वर मनात गुंजत असताना.

*

**नवलCURRY**

# जंगलराज

**सौ. मुकुला प्रदीप नवलकर**

खरपूस मार खाल्यानंतर,आता पळणे, त्याला अजिबातच शक्य नव्हते. गावातून निघून कसाबसा तो जंगलापर्यंत पोहचला. खरं तर हे सोंग वठवणे, आताशा त्रासदायक होऊ लागले होते. यथेच्छ खादाडी करता आली हे खरं, पण त्यासाठी लढवलेली शक्कल, उपजत गाढवपणाने शेवटी अंगलट आलीच.

आता इथे जंगलात, कुणी नाही असे बघून, झुडपांच्या आडोशाला, अंगावरचे वाघाचे कातडे दूर फेकणार, तेवढ्यात समोरच्या जाळीत हालचाल झाली. पापणी लवते न लवते तोच तिथून निघून, एक निळा प्राणी समोर आला. पुढचे दोन्ही पाय लांब ताणत आणि त्यावर मुंडी टेकवत, नाटकी आवाजात म्हणाला, ''महाराजांचा विजय असो. तुम्हीच खरे जंगलचे राजे. काय आज्ञा आहे, या सेवकासाठी?''

त्याच्या अचानक येण्याने, गाढव बावचळले. दोन पावलं मागे गेले. त्या गडबडीत त्याच्या अंगावरचे कातडे सरकले आणि एक कान उघडा पडला.

निळ्या रंगाचा हा प्राणी, पाहिल्यासारखा तर वाटतोय; पण ओळखू येत नाही. प्रश्न विचारतो आहे, म्हणजे उत्तराची वाट पहात थांबणार. गाढव बुचकळ्यात पडले. बोललो तर पंचाईत आणि न बोलूनही मुसीबत. त्याच्या अंगावरचे वळ ठणकायला लागले.

मग तोच निळा प्राणी धूर्तपणे म्हणाला, ''महाराज, मला ठाऊक आहे की, आपण तपश्चर्या करीत आहात, म्हणून सध्या आपण मौन धारण केले आहे. तुम्ही बोलणार तर नाही, पण सर्व उत्तम ऐकू यावे, याकरिता तुम्हाला तिसऱ्या कानाचे वरदानही मिळाले आहे. मलाही ह्या निळ्या रंगाचा प्रसाद मिळाला आहे. आपण मला भेटलात, हे मी माझे भाग्यच समजतो. खरोखर, जंगलदेव किती कृपाळू आहेत. आता यापुढे त्यांच्याच आज्ञेने,तुम्ही माझे गुरु आणि मी तुमचा चेला.''

कोणताही प्रसंग निभावताना, त्यात सरशी नाही झाली, तर तो कोल्हा कुठला?

खरं तर जाळीत बसून खूंफियागिरी करताना, त्याला या वाघोबाची उंची जरा खटकली होतीच. शिवाय मुंडी टेकवून मुजरा करताना, चार खूर आणि शेपटीचा गोंडा, त्याच्या चाणाक्ष नजरेने टिपला होता.

त्या दिवशी दोघांचीही ग्रहदशा सारखीच होती. चवीचवीने, तुडुंब खायला तर मिळाले, पण पोट भरल्यावर गाणं म्हणण्याच्या हुक्कीने मात्र, एकाच मुहूर्तावर, त्या दोघांचेही बिंग फोडले.

माणसांनी झोडपलेला गाढव आणि जातभाईंनी टोळीतून हाकलून दिलेला निळा कोल्हा, अशारितीने जंगलात आमनेसामने आले आहेत. आता पुढे!

रात्रीच्या अंधारात, वाघाचे कातडे ओढून, मस्त मजेत चरणारा गाढव, जेव्हा कोल्ह्याच्या नजरेसमोर आला तेव्हाच, धोब्याच्या अंगणातील, निळीच्या हौदात पडलेला कोल्हा, गाढवाला आठवला होता.

आता दोघं एकमेकांना उल्लू बनवायला, आयडिया शोधू लागले आहेत... खरंतर बिच्चारं गाढव, आपलं सोंग लपवून ठेवण्यासाठी धडपडत होतं तर चतुर कोल्होबा, मौके पर चौका, मारण्याचं ठरवत होते.

कधी नव्हे ते गाढव विचार करू लागले तेव्हा त्याच्या लक्षात आले की ह्या लबाडाला चकवणं शक्य नाही आणि बहुतेक त्याला संशयही आला आहे. त्यात अंगावरचे वळही ठणकतच होते.

नेहमीपेक्षा विपरीत परिस्थितीत, फार काळ टिकाव लागणार नाही हे ओळखल्यावर, त्याचा मूळ स्वभाव उफाळून आला.

आवेशाने त्याने पाय ताणले, हवेत दोन, चार दुगाण्या झाडल्या आणि अंगावरचे कातडे भिरकावून, गाढव मनसोक्त रेकले. हहां हं हहां हं.

कोल्होबा समजून चुकले की, गडी खचला आहे. मग पुढे होऊन, नाटकीपणे म्हणाले, ''अरे गाढवभाऊ, तुला हा शहाणपणा शोभत नाही. थोडं थांब. यातूनही मार्ग निघेल. माझ्याकडे जबरदस्त प्लॅन आहे. असा डाव अर्धवट सोडून निघून गेलास, तर पळपुटा म्हणतील लोक तुला.

''लोकांचं म्हणणं गेलं तिकडे चरायला आणि तुझा प्लॅनही, तुलाच लखलाभ होवो.'' गाढव वैतागून म्हणालं, ''आता मला माझं रुटीन सुरु केले पाहिजे. मी चाललो परत माझ्या मालकाकडे ओझी वाहायला. फुकटचं आयतं खायचा आणि रिकामं बसून आराम करण्याचा, उबग आलाय मला.'' असं म्हणून शहाणं गाढव निघून गेलं.

आता उरले दोघे. एक धूर्त कोल्हा आणि दुसरा जीव गमावलेला वाघ.

मग कोल्हा पुढे झाला. वाघाच्या कातड्यासमोर छाती फुगवून उभा राहिला.

जरासं झुकून कावेबाजपणे म्हणाला, ''महाराजांनी काळजी करू नये. हा मुसद्दी प्रधान पुन्हा एकदा तुमचे राज्य स्थापन करेल. या जंगलात पुन्हा एकदा तुमची म्हणजे पर्यायाने माझी सत्ता नांदेल. दोघांचे ही भले होईल. तुमचा मान राहील आणि माझीही जिंदगी बनेल. आता लगेच कामाला लागतो.'' असे म्हणत निळोबा निघणार, तोच... इतका वेळ झाडांवर स्थिर बसून, घडणाऱ्या घटनांचे शांतपणे निरीक्षण करणारी माकडांची टोळी अचानक सक्रिय झाली. काहींनी वरच्यावर गोंधळ घालायला सुरुवात केली; तर काही फांद्यांवर लोंबकळत, वाकुल्या दाखवत आवाज काढू लागले. काही तर चक्क जमिनीवर येऊन आपली हिम्मत अजमावू लागले.

कोल्होबा मनात समजले की, प्रसंग बाका आहे. आपल्या गुप्त कारस्थानाचे हे चश्मदीद गवाह आहेत. जरा सबूरीने घेतलं पाहिजे.

(पान ५ कॉलम १ वर)

**थोडं बोलू या**

# आता विसाव्याचे क्षण

-श्रेया तळपदे

आज सकाळी उठले. सकाळचा चहा-न्याहारी या सगळ्याची गडबड आटपली. नवरा आणि मुलगा चहा-नाश्ता करून आपआपल्या कामाला गेले. आज दिवसभर मी एकटीच होते घरात. आज तसं फारसं काही कामही नव्हतं. म्हटलं, खूप दिवसांनी असं शांत बसायला मिळालंय तर निवांत घालवू दिवस. टी.व्ही. बघू, पुस्तक वाचू, गाणी ऐकू.

यातील नेमकं पहिलं काय करावं? असा विचार येताच माझ्या मनाने उत्तर दिलं, 'गाणी ऐकूया'. टी.व्ही. तर रोजच दृष्टीस पडतो. पुस्तकही अधून-मधून नजरेखालून जातातच; पण गेल्या कित्येक दिवसात आपल्या आवडीची गाणी ऐकली नाहीत. म्हणून लगेच एफ. एम. लावले; पण कानांना पसंत न पडणारी डी.जे. रिमिक्ससारखी गाणी ऐकू येऊ लागली. लगेचच रेडिओ बंद केला. कारण, आज मनाला शांतता देणारी गाणी ऐकाविशी वाटत होती. मग बऱ्याच वर्षात उघडूनही न बघितलेल्या कपाटाची आठवण झाली. तिथे अनेक आवडणारी गाणी खजिन्यासारखी साठवून ठेवलेली सी.डी.च्या स्वरूपात. त्यातली एक मी सी.डी. प्लेयरमध्ये लावली.

वाफाळलेल्या चहाचे कप घेऊन घरातील माझ्या आवडत्या कोचावर बसले. तसं तर कित्येकदा या कोचावर बसले असेन मी; पण आज या कोचावर बसण्याची मजाच काही वेगळी होती. रोज कामाच्या दगदगीतून स्वत:साठी असा वेळ कधी मिळालाच नव्हता. चहा पीत असतानाही एरव्ही घड्याळाकडे लक्ष असायचं. अनेक कामाच्या गोष्टी डोक्यात चाललेल्या असायच्या. आज मात्र असं निवांत स्वत:साठी जगणं अनुभवत होते आणि अशातच त्या सी.डी.मधून कानांना सुखावणारे गीत ऐकू आलं. गीताचे शब्द होते,

'बाई-बाई मन मोराचा कसा पिसारा फुलला'

हे गीत ऐकता-ऐकता खरंच माझ्या मनाची अवस्था त्या गीतातून प्रतीत होत आहे असं वाटू लागलं. माझ्या मनाला आज खूप दिवसांनी ताजंतवानं वाटायला लागलं होतं. कारण खूप काळाने मी माझ्या मनाला आवडणाऱ्या गोष्टी करत होते. तुम्हाला वाटलं असेल की बाई कळलं आम्हाला आज तू तुला आवडणाऱ्या गोष्टी करत आहेस. कितीवेळा तेच सांगशील. पण खरं सांगू, तर हे मी सतत माझ्याच मनाला सांगत होते, माझे मन अजूनही स्वत:साठी श्वास घेऊ शकते ह्याची शाश्वती किंवा जाणीव मला होत रहावी यासाठी कदाचित.

कसं असतं सहसा जीवन जगत असताना आम्ही बायका-मुली, सुना, बायको, आई या भूमिकेत इतक्या गुंतून जातो की एक व्यक्ती म्हणून आपलं वेगळं असं व्यक्तिमत्व आहे हे विसरून जातो. इतरांच्या आवडी जपता-जपता आपल्या आवडी जोपासणं राहूनच जातं. पण आज माझ्या आवडीची गाणी ऐकत असतांना माझ्या मनाला आनंद मिळत होता. सुखावणारं गाणं आणि मन मोहरून टाकणारा आवाज 'लता मंगेशकर' यांचा. मग मन मोराचा पिसारा फुलला नाही तरच नवल.

लतादीदींच्या आवाजातली अनेक गाणी तुम्ही-आम्ही ऐकली आहेत. मी जेव्हा-जेव्हा त्यांच्या आवाजातलं एखादं गाणं ऐकते तेव्हा-तेव्हा ते गाणं नव्याने पहिल्यांदा ऐकल्यासारखं वाटतं. त्यांच्या आवाजाची जादू मनाला भूरळ घालणारी आहे. हे काही मी तुम्हाला नव्याने सांगण्याची गरज नाही. पण त्यांची गाणी ऐकताना मला नेहमी त्यातील एखादं गाणं आपल्या आयुष्यातील घडत असलेल्या किंवा घडून गेलेल्या एखाद्या घटनेशी, अनुभवांशी मिळतं-जुळत वाटायचं.

लता मंगेशकरांनी गायलेलं ते गाणं तुम्हाला आठवतंय का?

'राजाच्या रंगमहाली सोन्याचा पलंग'

हे गाणं ऐकताना आजही मला माझ्या मैत्रीणींची आठवण येते. माझं लग्न जमल्यावर सतत मला चिडवणाऱ्या, 'आता काय बाबा नवऱ्याकडे जाणार, गाडीवाला नवरा. राणीसारख्या थाटात राहणार. मग तू आम्हाला विसरणार' ही त्यांची वाक्य आठवतात, त्यावेळी लाजरी-बुजरी मी आठवते. आणि हसू येते. गाण्यांचं आपल्या आयुष्यात किती महत्त्व असतं ना? म्हणजे मला तरी असंच वाटते. ही

(पान ५ कॉलम १ वर)

# मुंबई बदलते आहे...

-उज्ज्वला गोविंदराव भगवंतराव आगासकर
बी. आर्क. (मुंबई), फोटोजरनॅलिस्ट

समाजामधल्या दोन कुटुंबांमध्ये बोलणी होऊन जेव्हा नातेसंबंध जुळतात, तेव्हा 'सोयर जुळले, सोयरीक झाली' असे आपण म्हणतो. गुजराथमधल्या यादव राजाने इथे येऊन 'महिकावती' राजधानी नेमली आणि कारभार सुरळीत चालवण्यासाठी सात जातींची कुटुंबे गुजराथमधून इथे आणली, ती तेराव्या शतकामध्ये. तिथले बलिष्ठ क्षत्रिय, म्हणजे पाटणचे प्रभू हे आपले पूर्वज तेव्हा आपला गाशा तिथून गुंडाळून इथे रहायला आले, बरोबर आपले रीतिरिवाज, पेहराव, खाण्या-पिण्याच्या सवयी आणि उपास्य दैवते घेऊन आले आणि तेव्हापासून इथलेच झाले हा इतिहास आहे, हे आपण सारे जाणतो. या विषयावर मी जेव्हा विचार करते तेव्हा असा मजेदार विचार येतो की मागच्या आठ शतकामध्ये काय काय बदल झाले ते आपण पहातोच आहोत, पण पाठारे परभांची मुंबईशी सोयरीक ही माहीमच्या किल्ल्यापासून सुरू झाली!

त्यामुळे महिकावतीच्या स्थापनेच्या पूर्वीचा अर्थात मुंबापुरीशी पाठारे परभांच्या झालेल्या सोयरिकीच्या आधीचा मुंबईचा हजारों वर्षांचा जो इतिहास आहे, त्याच्या वाटेला जाण्यात मला काही अर्थ वाटत नाही.

भारतामधली अचाट संपत्ती आणि इथले सर्व विशेष मसाले यांवर डोळा ठेवून जे जे परके लोक इथे पाय रोवू पहात होते त्यांची मानसिकता हा एक अभ्यासाचा विषय आहे. मोगल म्हणा, पोर्तुगीज, डच, फ्रेंच, इंग्रज म्हणा, या सर्वांचे मायदेश हे जगात इतरत्र कुठेतरी होते. ते सोडून इथे स्थायिक होण्याचा त्यांचा उद्देश नव्हता. इथे बसून कमाई करायची, लुटालूट करायची आणि मायदेशाच्या राजाचा (किंवा राणीचा) खजिना भरायचा हे त्यांचे मुख्य सूत्र असायचे. त्यातून त्यांचे राजे (किंवा राण्या) त्यांना बक्षीस म्हणून सरदारकी, मोठ्या जमिनी असली इनामे देत. मात्र हे स्वत:चे फायदे करून घेताना, इथले मूळ वस्तीचे लोक असत त्यांना ते सतत तिऱ्हाईतपणाने वागवत, फक्त त्यांच्या क्षमतेचा वापर करून घेत असत. शिवाय त्यांच्यापेक्षा बलिष्ठ असे इतर तिऱ्हाईत त्यांच्या लूटमारीमध्ये सामील होऊ नयेत म्हणून सतत लढाईची तयारी ठेवावी लागे. या तयारीमधूनच यादवांच्या महिकावतीच्या पाठोपाठ, मोगल, पोर्तुगीज, आणि इंग्रजांनी मुंबईच्या सर्व बेटांच्या किनाऱ्यांवर मजबूत किल्ले बांधले. इथे त्यांना दडून बसता येत असे आणि शत्रूवर इथून हल्ला करता येत असे.

इथे येऊन बसलेल्या या उपऱ्या लुटारूंनी लफंगे उद्योग भरपूर केले. इ.स. १५३४ मध्ये मुसलमानांना हाकलून ही बेटे बळकावणाऱ्या पोर्तुगीजांनी, १५३८ मध्ये एका शास्त्रज्ञाला मुंबई बेट भाड्याने दिले. त्याने बेटाच्या पूर्व किनाऱ्यावर 'मॅनॉर हाऊस' या नावाचा मोठा दगडी बंगला बांधला. तो गेल्यावर त्या बंगल्या १६२६ पासून पोर्तुगीज गव्हर्नर राहात असे. नंतर पोर्तुगीजांनी मुंबई इंग्रजांना आंदण दिल्यावर (हा मोठाच लफंगेपणा) १६६८ मध्ये मॅनॉर

(पान ५ कॉलम ४ वर)



वरळी बेटाच्या पश्चिम किनाऱ्यावर पोर्तुगीजांनी १५३४ नंतर बांधलेला मजबूत किल्ला. हा आज चहुबाजूंनी झोपडपट्टीने वेढलेला दिसतो.

# TRAVELOGUE

-Aadhar Kothare

**Foodie Wagon – Tale of 5 eateries in 2 cities in Maharashtra**

In this article, we will cover 5 eateries with 5 different cuisines, spread across 2 cities of Maharashtra – Pune and Nashik.

**Pune**

**Maskawala & Co**. – If you are in Pune and want to try Bun Maska, Kheema Pav, you would by default go to M.G. Road, or the Camp area, or near the Pune station to places like Vohuman café, Goodluck Café, Café Yezdan but none in the areas near Kothrud, Karve Road, etc. But now you don't have to travel all the way to Camp-side. There is a new Irani café that has come near to Karve Road. Maskawala & Co. is pretty close to Joshi's Museum of Miniature Railways on Karve Road, Kothrud near Karishma Society. Many people visit this restaurant to try mouth-watering chicken rolls, chicken sandwiches and biryani. Do not leave without enjoying good bread pudding, coconut cakes and cheesecakes. It is nice to enjoy delicious coffee, ginger tea or lemonade.

The freshness of the Bun Maska Paav and Bun Paav Jam can be felt with the first bite itself. We tried Anda Kejriwal and Chicken Kheema Pav. Anda Kejriwal is kind of Anda Mughlai served on the bread but surely is tasty and worth trying. Chicken Kheema Paav can be tried with Bun Maska or Paav Jodi. For soft drink, you must try the Ardeshir's cola which is the oldest Cola company of India and is available in few Parsi cafes only. The menu is quite vast and quite reasonable as well with wide range of Eggs/ Omelettes, Sandwiches, Kebabs, Rolls, Gravy's and Biryani's so one can come here to eat anytime from Breakfast to Dinner.

It has seating available, as well as takeaway service and they provide home delivery as well. It is open on all days of the week from 8:00 am to 10.30 pm and accepts all types of payment options.

**Fish Curry Rice** – When it comes to fresh Fish-eating options in Maharashtra, one can only think of coastal areas such as Mumbai, Alibaug, Ratnagiri, Konkan, etc. and Pune would never be in the top 5 cities for fresh fish, mostly because there aren't much of good fish eating or Malvani food options in Pune and if there are any, one won't be guaranteed to get a good and fresh catch. But now there is one right in Kothrud named Fish Curry Rice, near to Kothrud bus depot. The place was earlier on Law college road but has now shifted to Karve Road, Kothrud, next to P.N. Gadgil. Apart from the Kothrud joint, this food joint is also at Viman Nagar and Baner as well, but they are more of franchises of the original place in Kothrud. The restaurant was started back in 2014 and is run by Mr. Sandesh Bhat (son of Marathi theatre/play organization Suyog's owner Mr. Sudhir Bhat). The ever gracious **Sandesh Sudhir Bhat** as always is there to host us and to ensure that we are served undoubtedly the best of Seafood in Pune.

The restaurant welcomes us with Kokum saar drink which is on the house. One can choose, from the vast menu that the restaurant offers in sea-food, chicken and mutton delicacies, where one can either opt for Ala-carte or choose one from a wide range of Thalis. The Thalis will have 1 dry and 1 gravy item, 1 fried item, 3 chapatis, rice, chutneys, etc. One can try different lip-smacking items such as Bangda Fry, Pomfret fry, spicey prawns' pickle, Surmai Fish curry, Crab masala, Prawns Aluwadi and many other sea-food options. Non-seafood fans need not feel left out here, as the place does excellent chicken, mutton and vegetarian thalis as well. One should not forget to try out the Solkadhi after having the sumptuous meal.

The best part of this place is that the owner will always be there to ensure you try out different and new dishes if you haven't tried them before. He makes sure that the sea-food is fresh and personally makes sure that the fish catch is brought in to Pune from Mumbai on a daily basis. The place has decent seating area and they make sure that the place is clean and do not smell of sea-food, which generally is an issue for vegetarians visiting a sea-food place with their non-veg eating friends and family. The place is closed on Monday, but operational on all other days Lunch - 11:30 am to 3:00 pm and Dinner- 7:30 pm to 11:00 pm and accepts all types of payment options.

**Wadeshwar** - Wadeshwar Group venture, is a four-decade old restaurant chain serving Maharashtrian & South

Indian cuisine. It serves a variety of South Indian dishes along with a number of street food items.

Along with the traditional Tomato Uthappa, Ghee Dosa, Idli, the Pav Bhaji is exceptionally good and worth a try. The food is completely vegetarian and quite budget friendly as well. The most popular dishes are the ghee Idli, set Dosa, molgapodi idli, pessarattu dosa, aappe, kothimbir wadi and coconut kachori. It also offers variety of tasty snacks such as Chole Bhature, Ragada Pattice, Sev batata Puri, Bhel Puri, Batata Wada, Thalipeeth, Poha, Upma, Pineapple Sheera, Sabudana Khichdi, etc. as well as juices, milkshakes and coffee/tea.

This place has a spacious seating. The ambience of the place is cheerful and is usually full. The food served is very tasty and reasonably priced. The original branch is located on F.C. Road, and has multiple outlets across Pune at Karve Road, Kothrud, Baner, Law College Road, etc. It has seating available, as well as takeaway service and they provide home delivery as well. It is open on all days of the week from 7:00 am to 11:00 pm and accepts all types of payment options.

**Nashik**

**Sadhana – Chulivarchi Misal** - Sadhana Misal has been serving Nashik delicious Chulivarchi Misal Since 1959. It is one of the oldest food places in Nashik, and is famous for its delicious Misal Pav. Misal has always been the most favourite breakfast in Maharashtra and their specialty is Chulivarchi Misal (Misal Pav cooked on wood fire). The restaurant has rural village ambience, with mud walls and hut style architecture, khaat seating and open area among trees and plants. There are Bullock cart, Horse and Camel rides for recreational activities. It is huge place that can accommodate hundreds of people together.

It offers Misal pav, papad kheecha, jalebi and bhakri. The size of pav was bigger than usual pav. They also serve Jain Misal for the ones who have a liking for it. To accompany the zesty and tasty Misal, they also serve tea. Apart from Misal, they also serve Gulachi Jalebi (Jalebi cooked in Desi Ghee and Jaggery syrup), Buttermilk, Solkadhi, Lassi and Chulivarcha Ice-cream (Pot ice-cream made from pure milk boiled over Chulha). They offer fire and smoke paan as well.

It is situated at 'Hardev Baug, Gangapur – Satpur Link Road, Bardan Phata, Near Someshwar, Nashik, Maharashtra – 422222. It is vegetarian friendly restaurant that also serves Vegan options. It has seating available, as well as takeaway service and they provide home delivery as well. It is open on all days of the week from 8:00 am to 3:00 pm and accepts all types of payment options.

**Hotel Radhakrishna** – Don't ever judge a book by its cover is really an apt phrase for this place. By the name it might feel that it's a vegetarian restaurant that pre-dominantly serves South Indian food. But it is the ultimate destination for food lovers keen to taste some of the finest seafood cuisines. It is the first original seafood restaurant of Nashik to have completed 30 successful years of providing it's patrons a fine dining experience.

Hotel Radhakrishna is located on Trimbak road at Satpur in Nashik. The renowned restaurant is pioneered in seafood, multi cuisine dining, with a sumptuous range of Indian, Chinese, Malvani, Tandoori and Maharashtrian dishes served up freshly every day. Their cuisine is influenced by the flavors and styles of many cultures so diners can enjoy savouring different mouth-watering dishes. Though they offer both veg and non-veg cuisines, their specialities include Prawns koliwada, Surmai Fry, Sukha Chicken, Bombil fry, Mutton Kheema, Kombadi Wada, Solkadhi and many more along-with sumptuous mouth-watering Thalis (Chicken, Mutton, Prawns, Fish, etc.) and Biryanis. The best part of this restaurant is that they offer different gravy varieties with similar sea-food but made with coconut base or onion base, with each having very different taste that one would remember for months.

It has seating available, as well as takeaway service and they provide home delivery as well. It is open on all days of the week for Lunch - 11:30 am to 4:00 pm and Dinner- 6:30 pm to 11:00 pm and accepts all types of payment options.

*

(पान २ कॉलम ४ वरून)

प्रलोभन दाखवून ह्यांनाही आपल्या कार्यात सामील करून घेतले पाहिजे.

मनात चरफडत, तरी लटक्या प्रेमाने कोल्होबा पुढे सरसावले खरे; पण लगेचच सावरले.

यावेळी प्रतिस्पर्धी बिलंदर आहे, सहज बधणार नाही आणि भरवशाचा तर नाहीच नाही. धोक्यांची सूचना देऊन, इतर प्राण्यांना सावध करणारे जंगलातील टेहळणीखोर, अशी यांची ओळख आहे. म्हणून या प्रकरणात यांचा उपद्रवच होऊ शकतो. तरी थोडी उसंत घ्यावी. थोडा अंदाज घ्यावा. आधी त्यांची खेळी पहावी, मगच निर्णय घ्यावा, असे ठरवत कोल्होबा स्वस्थ राहिले.

झाडांवर माकडांचा उच्छाद चालूच होता. त्यांना फायदातोटा माहीत नव्हता. त्यांच्यालेखी अजून काही घडणे बाकी नव्हते. त्यांचं काम तर झालं होतं. कोल्होबांची फजिती झाली, याचाच त्यांना अतीव आनंद होता.

दोन्ही पक्ष असे,आपल्याच नादात खुळावले असताना एकाएकी,खोल दाट जंगलातून थरारक डरकाळी घुमली. एकदा. ..एकदाच!

कोल्हा दचकला. माकडं क्षणात स्तब्ध झाली.

सर्वजण सावध पवित्रा घेत, कानोसा घेऊ लागले.

जशी त्यांना पुढच्या अरिष्टाची कल्पना आली, तशी एक एक करून साऱ्यांनी काढता पाय घेतला. उरलं फक्त वाघाचं निर्जीव कातडं आणि किर्रजंगलात परावर्तित होणारी चेतनध्वनीतील जरब.

सगळी खलबतं क्षणात फोल ठरली. सगळे मनसुबे पार धुळीला मिळाले. विकृतीचा जयउन्माद थंड झाला...

कधी काळी, कोण्या एका, निर्मनुष्य जंगलात झाडाझुडुपांच्या साक्षीने एक कुटील कारस्थान हाणून पडले. तरीही आज या घडीला गजबजलेल्या भरवस्तीत, माणसांत वावरणारी जनावरं, अजूनही...तेच कपटी डावपेच लढवीत आहेत.

पण बाबांनो, लक्षात असू द्या की, कितीही चतूर, कितीही चलाख योजना असली तरीही, मतलबी स्वार्थापोटी, आपल्या उणीवा छपवत सोंग आणता येत नाही आणि अहमन्य दुष्ट हेतूने, इतरांना असहाय्य, निराधार मानून,फार काळ वेठीस धरता येत नाही. असे करणे म्हणजे अनावस्थेला आमंत्रण देणे. ते कधी तुमच्याच जीवावर बेतेल, याचा भरवसा नाही.

आपल्या वाट्याला आले आहे तेच स्वीकारून तेवढेच आनंदाने साजरे करणे, येवढेच समजून घेणे आवश्यक आहे.

आणि हेही लक्षात घेणे तितकेच गरजेचे आहे की, दिवस-रात्र आपण, आपला जीव जगवत असताना जोपर्यंत आपल्या बाहूंत बळ आहे, आपल्या धमन्यांत रग आहे आणि आवाजात दम आहे, तोपर्यंतच आपल्या कातड्याला किंमत आहे.

समयोचित अवधान, प्रासंगिक साहस, प्रबळ हुकुमत ह्या निकषांवरच जीवनदान, हा इथला सिद्धांत आहे.

कारण, इथेही जंगलराजच आहे.

✳

# आठवणींना उजाळा



माझ्या चुलत बहिणी कविता व गांधारी राणे लताबाईंच्या बरोबर.

त्यांनी लताबाईंबरोबर अनेक कोरस गाणी गायली आहेत. त्यासुद्धा आता काळाच्या पडद्याआड झाल्या आहेत.

सी. रामचंद्र, वसंत देसाई, अल्लारखां, मदन मोहन, ग्यान दत्त, नौशाद, गुलाम हैदर, सुधीर फडके अशा अनेक संगीत दिग्दर्शकांच्या गाण्यात त्यांनी लता मंगेशकरांच्याबरोबर कोरसमध्ये भाग घेतला होता.

I consider myself lucky I have inherited some music genes from my family.

**-सुजन राणे**

(पान ३ कॉलम २ वरून)

गाणी आपल्याला हसवतात, रडवतात. कधी-कधी आपल्या आठवणींना उजाळा देतात तर कधी थकलेल्या मनाला उभारी देतात. त्यातून लतादीदींच्या आवाजातील गाणी तर प्रत्येकाच्या हृदयाला भीडतात. आज या गाण्यांनी, लतादीदींच्या आवाजाने माझ्या विचारांना व्यापून टाकले असतानाच दुसरा दिवस उजाडला तोच 'गीत-संगीताच्या आयुष्यातला काळा दिवस म्हणून. सगळीकडून बातम्या येऊ लागल्या. 'लता मंगेशकर' यांनी शेवटचा श्वास घेतला. 'दीदींना देवाज्ञा झाली'. एका संगीतमय युगाचा अस्त झाल्यासारखे वाटले. दिवसभर टी.व्ही.समोर बसून 'लतादीदींची' अंत्ययात्रा पाहिली. कित्येकांच्या डोळ्यातून पाऊस बरसत होता. लतादीदींचे गाणे सतत टी.व्ही वर वाजवले जात होते. 'मेरी आवाज ही पहचान है!'

खरंच दीदी गेल्या; पण या भारताला आपला आवाज देऊन गेल्या... त्यादिवशी 'लता मंगेशकर' ज्या मला ओळखत नव्हत्या ना कधी मी त्यांना प्रत्यक्षात पाहिले असं असतानाही त्यांची अंत्ययात्रा पाहून त्या आपल्यात नाहीत या जाणीवेने मन का पिळवटले होते? आपल्या आयुष्यात एक पोकळी निर्माण झाल्यासारखे का वाटू लागले? कधी न भरून येणारे नुकसान झाल्यासारखं का वाटत होतं? असे अनेक प्रश्न माझ्या मनाला पडले. पण कदाचित माझ्यासारखी अशी अनेक लोकं त्यांचे अनेक चाहते असतील जे माझ्यासारखंच दु:ख अनुभवत असतील.

दीदींचा आवाज, त्यांचे सूर त्यांना मिळालेली दैवी देणगीच होती.

कलाकार कलेला समृद्ध करतो की कलाकाराला कला समृद्ध करते. दीदींच्या बाबतीत म्हणायचे झाले तर दीदींनी गाण्याला समृद्ध केले आणि आपल्या देशाला 'लता मंगेशकर' नावाच रत्न मिळालं.

कलेला कोणतंच बंधन नसतं. ना देशाचं ना धर्माचं. कला कलाकाराला प्रगतशील बनवते, मोठं करते, ओळख देते, आत्मशक्ती देते, मानसिक समाधान देते. त्यामुळे प्रत्येकाने आपल्यातील एकतरी कला ओळखून निदान स्वत:साठी तरी जोपासायला हवी.

लता मंगेशकरांची अंत्ययात्रा बघत असताना समोर असलेल्या गर्दीसारखीच अशा विचारांची गर्दी माझ्या डोक्यात होऊ लागली आणि तेवढ्यात दीदींच्या आवाजातले गाणं वाजू लागले...

'अखेरचा हा तुला दंडवत'

त्या क्षणी माझ्या डोळ्यांना अश्रुंच्या धारा लागल्या. मनाने दीदींना दंडवत घालून निरोप दिला. दुसऱ्या दिवशी जड अंत:करणाने उठले आणि कधी नव्हे तो माझ्या मुलाने रेडिओ लावला एफ.एम. वरील गाणे कानावर पडले ते होते...

'आता विसाव्याचे क्षण

माझे सोनियाचे मणी''

असे सोनियाचे मणी अनेक पिढ्यांना देऊन गेल्या लता दीदी.

✳

(पान ३ कॉलम ४ वरून)

हाऊसमध्ये ब्रिटिश गव्हर्नर रहायला आला. त्याने मॅनॉर हाऊसभोवती तटबंदी करून घेतली व त्यावर अठरा तोफा बसवल्या. त्याला 'बॉम्बे कॅसल' असे नाव दिले. हा ब्रिटिश राज्यकारभाराचा त्या काळातला मुख्य पत्ता होता. हा बॉम्बे कॅसल अजून उभा आहे, पण तो भारतीय नौदलाच्या ताब्यात असल्यामुळे आपल्याला पहाता येत नाही. याच्या भोवतालीच १६७१ नंतर ब्रिटिशांनी मोठा किल्ला बांधला, त्याबद्दल नंतर लिहीन.

पश्चिमेला वरळी बेटावर समुद्रकाठी, नैऋत्येकडे तोंड करून पोर्तुगिजांनी मोठा चौरस दगडी मजबूत किल्ला बांधला, त्याचा फोटो पहावा. इतके दिवस हा किल्ला दुर्लक्षित होता, आता त्याच्या शेजारूनच वरळी वांद्रे समुद्री सेतू बांधला आहे आणि त्याच्या गच्चीवर अनेक मराठी-हिंदी सिनेमांचे चित्रीकरण करतात. त्या निमित्ताने हा इतिहासाचा साक्षीदार पहाता येतो.

✳

## अभिनंदन

✳ मधु मंगेश कर्णिक यांच्या साहित्यावरील पुस्तकात (अनघा प्रकाशन) प्रा. सुहासिनी कीर्तिकर यांच्या लेखाचा समावेश आहे.

दि. २७ फेब्रुवारीला लोपिस यांचे मीरा नावाचे संशोधनावर आधारित पुस्तक प्रकाशित झाले. त्याचे मलपृष्ठ सुहासिनी कीर्तिकर यांनी लिहिले आहे.

✳ डॉ. सुमन नवलकर यांचे लहान मुलांसाठी 'आपलं आपण' हे गोष्टीचे पुस्तक प्रकाशित झाले.

✳ डॉ. अंबरीष प्रफुल्ल विजयकर यांना २०२२ या वर्षीचा 'बेस्ट ट्रेंड सेंटर इन होमियोपाथी' हा पुरस्कार महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. हा सोहळा राजभवनात साजरा झाला.

✳

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणास देणगी

* श्री. अरविंद धराधर यांजकडून प्रभुतरुणास सप्रेम ५०००/-
* सौ. रोहिणी आणि श्री. अजित इंद्रसेन नवलकरकडून वीस जानेवारी २०२२ रोजी संपन्न झालेल्या त्यांच्या विवाहाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त प्रभुतरुणास रु. १०००/-

देणगीदारांस शुभेच्छा आणि मन:पूर्वक धन्यवाद.

## अभिनंदन

* चि. मेघनाद आनंद नैषध विजयकर या नऊ वर्षाच्या विद्यार्थ्याने 'ज्युनियर विभाग - नॅशनल डिझाइन चॅम्पियनशिप' मध्ये उत्कृष्ट क्रमांक मिळवून 'बिलाबॉग इंटरनॅशनल स्कूल' (सांताक्रूझ)चे नाव झळकविले.
* दिनांक २९-१-२२ रोजी पुणे येथील फिल्म, टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट येथे श्री. सुजन राणे यांनी काढलेले चित्रमहर्षि दादासाहेब फाळके यांचे तैलचित्र सन्मानाने लावले गेले. याप्रसंगी सौ. नीलिमा आणि श्री. सुजन राणे यांचा यथोचित सत्कारही झाला.
* २५-१-३३ रोजी महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य मराठी माध्यमिक शिक्षक संघ आणि स्वामी मुक्तानंद हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' साजरा झाला. या अंतर्गत 'साहित्यिक आपल्या भेटीला' कार्यक्रमात डॉ. सुमन नवलकर यांची मुलाखत घेतली गेली.
* डॉ. सुमन नवलकर यांचे सुपुत्र श्री. सुश्रीत एस. नवलकर यांचे 'द इनरवेशन-अ जर्नी थ्रू द प्रॉबेबिलिटीज' हे 'सायन्स फिक्शन' असलेले पुस्तक प्रसिद्ध झाले.
* सॉलिसिटर राजन जयकर यांचे ॲमेझॉनवर पहिले इबुक प्रसिद्ध झाले. त्याचे नाव आहे - 'ब्युटिफूल बॉम्बे'

## प्रतिक्रिया

संपादक,

जानेवारी महिन्यातले आपले संपादकीय फार आवडले. श्री. प्रताप वेलकरांवर आपण फार छान आणि समग्र लिहिले आहे. वेलकर जाण्याआधी दोन दिवस मी त्यांच्याशी फोनवर बोललो होतो. अतिशय प्रामाणिकपणे कार्य करणारा माणूस. त्यांच्या 'पाठारे प्रभुंचा इतिहास' या पुस्तकात माझा माझ्या आजोबांवर लेख आहे. आमचा जुना ऋणानुबंध होता.

कळावे,
आपला,
**सुजन राणे**

सुहासिनी,

जानेवारीचा अंक फारच छान काढला आहेस. प्रताप वेलकर यांच्याविषयी तर उत्तम लिहिलं आहेसच पण मला विशेष आवडला तो बागेश्रीच्या नवीन पुस्तकाच्या प्रकाशनाच्या निमित्ताने तू तिच्या एकूणच कारकीर्दीचा आणि तिच्या वेगवेगळ्या क्षेत्रांतल्या नैपुण्याचा जो आढावा घेतला आहेस तो संपादकीयाचा भाग. खरंच ती सर्वगुणसंपन्न व्यक्ती आहे आणि आपल्या ज्ञातीचं एक भूषण आहे. अशा व्यक्तीचं आणि आपलं जवळचं नातं असलं तर मग काय? विशेष अभिमान वाटतो. तू हा अंक पाठविण्याची व्यवस्था केलीस यासाठी तुझे खूप खूप आभार.

**-मृदुला प्रभुराम जोशी**

(बागेश्रीताईंच्या पुस्तक प्रकाशन समारंभास श्री. दीपक धैर्यवान उपस्थित होते. त्यांनीही फोनवर प्रतिक्रिया नोंदवली. खरे तर मृदुला, मी घेतलेला आढावा त्या समारंभातच मुलाखतीच्या कार्यक्रमाद्वारे घेतला गेला होता. मी फक्त 'भारवाही'! असो. -संपादक)

Dear Editorial Team, Prabhu Tarun

well, I have been calling Aarti and teasing her after every article published that you write on such a serious subject; you must write something very light to go with your age.

But her december finale article Placebo Nocebo and Vs was so thought provoking and inspired positive thinking. This enlightening of positive thinking was needed for an hour in view of the recent wave of pandemic. Wow, that's great, Aarati keep it up. I must also congratulate suhastai for motivating young writers to write and creating Prabhu Tarun Magazine, a platform for young talent.

Thanks and regards,

**-Milind Kothare**
Mobile : 9920023860

✳

## प्रभुतरुणाची डायरी

### नांदा सौख्यभरे

| | | |
|---|---|---|
| २१-१-२०२२ | श्री. ऋषभ सुनील राणे | कु. रसिका नंदकुमार भावे (आं. ज्ञा.) |
| २५-२-२०२२ | श्री. मिथील प्रदीप धुरंधर | कु. ऐश्वर्या बगवथीअप्पन (आं. ज्ञा.) |

### विवाह सुवर्ण महोत्सव

२१-१-२०२२ कु. रोहिणी जयंत देसाई श्री. अजित इंद्रसेन नवलकर

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| १४-१-२०२२ | श्री. दिलीप गजानन जयकर, | वय ७४, | बोरिवली |
| १८-१-२०२२ | श्री. जयपाल रमाकांत कोठारे, | वय ९१, | खार (प.) |
| २७-१-२०२२ | श्री. प्रद्युम्न कृष्णनाथ नायक, | वय ६१, | अंधेरी |
| २८-१-२०२२ | श्री. उदय बाळाराम जयकर, | वय ७८, | वडाळा |
| २९-१-२०२२ | श्री. अविनाश (उदय) विष्णू कोठारे, | वय ७५, | दुबई |
| ०२-२-२०२२ | सौ. लीना दीपक विजयकर, | वय ७४, | खार |
| ०८-२-२०२२ | श्री. विजयकुमार प्रभाकर नवलकर, | वय ८४, | कांदिवली |
| २८-२-२०२२ | श्री. योगेशचंद्र दत्तात्रय आगासकर | वय ८६, | अंधेरी (पूर्व) |

**Statement about ownership and other particulars about news paper**

**PRABHU TARUN**
**Form IV (See Rule 8)**
**To be published in the first issue after the last day of February**

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | Place of Publication | : | B3 Parijat, Patel Estate, Jogeshwari, Mumbai-400 102. |
| 2) | Periodicity of Publication | : | Monthly |
| 3) | Printers Name | : | Smt. Suhasini kirtikar |
| 4) | Address | : | Same as above |
| | Editors Name | : | Smt. Suhasini kirtikar |
| | Nationality | : | Indian |
| 5) | Address | : | Same as above |
| 6) | Name & Addres of Individuals who own the News Paper and Partners of Sharehold holding more than one Percent of Capital. | : | Board of Trustees Prabhu Tarun |

I Smt. Suhasini Kirtikar hereby declare that particulars given above are true to the best of my knowledge and belief.

**16-03-2022** **Suhasini Kirtikar**
Mumbai Signature of Publisher

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४०००१०२ येथे प्रकाशित केले.

**संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर** RNI NO. 14613/67